**कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपुर शहर येथील शासकीय कार्यालयांतील उपस्थिती व खाजगी आस्थापना चालू <u>ठेवण्यावर मर्यादित कालावधीसाठी निर्बंध आणणेबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समय- २०२०/ प्र. क्र.३५/१८ (र. व का.)**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० मार्च, २०२०.

<u>वाचा :</u> १. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : करोना-२०२० / प्र. क्र.५८ / आरोग्य-५, दिनांक १४ मार्च, २०२०.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ / १८ (र.व का.), दिनांक १८ मार्च, २०२०.

**<u>शासन निर्णय :</u>**

कोरोना विषाणूंचा (COVID-19) प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करण्याच्यादृष्टीने या विभागाच्या दिनांक १८ मार्च, २०२० च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २-अ अन्वये कार्यालयातील एकूण अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती ५० टक्के राहील, अशा पद्धतीने उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

२. तथापि असे जरी असले तरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अधिक तातडीची उपाययोजना म्हणून शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

अ) मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपुर शहर येथील सर्व शासकीय, निमशासकीय आणि महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती २५ टक्के ठेवण्यात यावी. यासाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सचिव/महापालिका आयुक्त/संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी याबाबत तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी.

ब) तथापि परिच्छेद २-अ येथे नमूद केलेल्या क्षेत्रामधील शासकीय/निमशासकीय / महानगरपालिका कार्यालयांमधील, नागरिकांना अत्यावश्यक सेवा देणाऱ्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

क) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ मार्च, २०२० च्या शासन अधिसूचनेद्वारे साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, १८९७ हा दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपुर शहर मधील सर्व खाजगी आस्थापना दिनांक २१ मार्च, २०२० पासून दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद राहतील. तथापि, नागरिकांना लागणाऱ्या अत्यावश्यक प्रकारच्या सेवा (उ.दा. बँकींग सेवा, औषधे, भाजीपाला, किराणा, दूध इ. अत्यावश्यक बाबींची दुकाने ) चालू राहतील. अत्यावश्यक सेवांबाबत कोणतीही संदिग्धता निर्माण झाल्यास त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी उचित निर्णय /स्पष्टीकरण करतील.

३. यासंदर्भातील उक्त परिच्छेद क्र. २-अ येथे नमूद केलेल्या क्षेत्रातील कार्यालयांसंदर्भात उर्वरित सूचना या विभागाच्या दिनांक १८ मार्च, २०२० च्या शासन निर्णयानुसार कायम राहतील. तसेच, सदरहू क्षेत्रातील कार्यालये वगळता अन्य कार्यालयांना दिनांक १८ मार्च, २०२० च्या शासन निर्णयातील सर्व तरतुदी लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२००३२०२०५७०१६७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anshu Sinha

Digitally signed by Anshu Sinha
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a3a7504068b24f4e7eb0277456c1fe4e5d31e4d0b0fdc81eb8816e33c5735b5b, serialNumber=e71208cc885f6d3c01b374ed0921df256abda4ed94d69472deb566c39b4ee68c, cn=Anshu Sinha
Date: 2020.03.20 21:00:36 +05'30'

( अन्शु सिन्हा )

सचिव (प्र.सु.र.व का.)

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव ( ५ प्रती ),
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ( ५ प्रती ),
७. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
८. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
९. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
१०. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१४. प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती ),
२५. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२०
२६. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५.
२७. नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे. एन. हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८,
२८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
२९. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी. भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०१४,
३०. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई ४००००४.
३१. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई ४०००१३.
३२. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८,
३३. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३४. निवड नस्ती ( कार्यासन १८ ).

To Control the presentee in MMR, Pune, Pimpri-Chinchwad and
Nagpur City Government offices and to put restrictions on private sector
As a preventive step against spreading of Corona Virus

**Maharashtra Govt.**
**General Administrative Deptt.**
**Govt. Resolution: Samay – 2020/ No. 35/18 dt.20.3.2020**

Ref: 1. Public Health Deptt Notification dt.14.3.2020
2. Govt. Resolution dt.18.3.2020

**Govt. Order:**

To avoid spread of Corona Virus and as precautionary measures, orders were issued that only 50% of Officers/Employees attendances in office vide order dated 18.3.2020

2. However, to avoid spread of Corona virus via public transportations/social contacts, govt. is taking below mentioned urgent decisions:

a) Only 25% attendance of employees in Govt. Semi- Govt. and Municipal Corporations in MMR, Pune, PCMC and Nagpur City. For this appropriate action is to be taken by Officers in Mantralaya/Municipal Corporation and Head of Offices.

b) Above orders will not be applicable to Officers/Employees who are providing essential services to citizens in Govt. /Semi Govt./Municipal Offices.

c) As per Public Health Deptt. Notification dt.14.3.2020, Prevention of Infectious Disease Act 1897 has been implemented from 13.3.2020. Under provisions of the said Act, all Pvt. Establishment in MMR, Pune, PCMC and Nagpur City, will remain close from 21.3.2020 to 31.3.2020. However essential services (for example Banking Services, Medicine, Vegetables, Grocery, Milk, etc. essential items shops) will remain open. If there is any doubt regarding what falls under 'essential services' then it will be decided/explained by respective District Collector.

3. In this reference, all other orders issued vide notification dt.18.3.2020 will remain applicable to offices mentioned in Para 2-a. for Offices other than para 2-a, all orders of notification dt.18.3.2020 will be applicable.

By the orders of Governor of the state.

Sd/-
Anshu Sinha
Secretary